# शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचे कार्यालय पुणे -१

१७ डॉ. आंबेडकर रोड, लाल देवळाजवळ पुणे-१

दुरध्वनी क्रमांक ०२०- २६१२२२१७ फॅक्स क- ०२०- २६१२२२१७

ई-मेल आयडी- dydpune@gmail.com वेब साईट- WWW.dydepune.com


**महत्वाचे**

**जा.क्र.शिउसं/उमाशि-४०३/११वी प्रवेश/पुवि/२०१७/3४ए०**

दिनांक :- 1 JUN 2017.

**प्रति,**

**सर्व प्राचार्य/प्राचार्या,**
**उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय,**
**पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्र.**

विषय :- **महाराष्ट्र राज्य मंडळा व्यतिरिक्त अन्य बोर्डाच्या (CBSE, ICSE, IB, इत्यादी) विद्यार्थ्यांसाठी..**

इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश अर्जाचा भाग-१ भरतांना पूढील प्रमाणे कार्यवाही करावी.

१. इ. ११ वी ऑनलाईन माहिती पुस्तिका २०१७-१८ वरील पान क्र-३५ वर नमुद केलेल्या झोननिहाय मार्गदर्शन केंद्रावरुन माहिती पुस्तिका लॉग-इन आयडी व पासवर्डसह (किंमत रु-१५० फक्त) घ्यावी.

२. माहिती पुस्तिका काळजीपूर्वक वाचून प्रवेश प्रक्रियेच्या http://pune.11thadmission.net या संकेतस्थळावर अर्ज भरण्यासाठी आवश्यक सूचना विचारात घेवून लॉग-इन करावे.

३. प्रवेश भरतांना अर्जातील अ.क्र. १ते ११ साठी पुढीलप्रमाणे माहिती भरावी.

अ.क्र.१- विद्यार्थ्यांने आपली माध्यमिक शाळा ज्या एरियात आहे त्यानुसार दिलेल्या तीन पर्यायामधून योग्य निवड करावी.

अ.क्र.२ - विद्यार्थ्यांने त्याला लागू असणा-या योग्य पर्यायाची निवड करावी.

अ.क्र.३ – विद्यार्थ्यांने त्याची वैयक्तिक माहिती स्वतः भरावयाची आहे. सदर माहिती आपल्या परीक्षेचे हॉलतिकीट/मार्कलिस्ट यावरून भरावयाची आहे.

अ.क्र.४- विद्यार्थ्याने आपल्या जातीचा संवर्ग निवडणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी इ. ११ वी ऑनलाईन प्रवेशाच्या संकेतस्थळावरील यादी पाहावी.

अ.क्र.५- विद्यार्थ्याने त्याचा पत्रव्यवहाराचा पत्ता नमुद करणे आवश्यक आहे.

अ.क्र.६- विद्यार्थ्यांने संपर्कासाठी मोबाईल क्रमांक नमुद करावेत (किमान एक मोबाईल नंबर टाकणे आवश्यक आहे.)

अ.क्र.७- विद्यार्थ्यांना विशेष आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास तसे नमुद करावे. व त्यासंबधी आवश्यक कागदपत्रे प्रवेश अर्ज अॅप्रुव्ह करतांना सादर करावेत.

अ.क्र.९- अल्पसंख्यांक कोटयात प्रवेश घ्यावयाचा असल्यास तसे नमुद करावे. त्यासंबधीची आवश्यक कागदपत्रे प्रवेश अर्ज अॅप्रुव्ह करतांना सादर करावीत.

अ.क्र.१०-शाळांतर्गत कोटयास पात्र असल्यास व प्रवेश घेऊ इच्छित असल्यास तसे नमुद करावे.

अ.क्र.११ चौकोनामध्ये Tick [√] अशी खुण करावी.

यानंतर विद्यार्थ्यांने त्याला इ. १० वी मध्ये मिळालेले गुण नमुद करावेत. महाराष्ट्रातील सी.बी.एस.ई. बोर्डाच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या श्रेणीपत्रकाचे (ग्रेड शिट चे) रुपांतर त्यांच्या इ. १०वी मध्ये उत्तीर्ण झालेल्या शाळेच्या मुख्याध्यापकाकडून त्यांच्या सही शिक्क्यासह गुणांमध्ये रुपांतरीत करुन घ्यावे.

महाराष्ट्राबाहेरील सी.बी.एस.ई. बोर्डाच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या श्रेणीपत्रकाचे (ग्रेड शिट चे) रुपांतर मुंबई येथील पुढील ०४ (चार) केंद्रांवरुन त्यांच्या सही शिक्क्यासह गुणांमध्ये रुपांतरीत करुन घ्यावे.

**१. आर एन पोद्दार स्कूल, सेंट ॲन्ड्रुज रोड, सांताक्रुझ (प.) मुंबई- ४०० ०५४.**

**२. राजहंस विद्यालय, एचएमपी स्कूल कॅम्पस, भवन्स कॉलेज जवळ, मुन्शी नगर, डी.एन.रोड, अंधेरी (प.) मुंबई- ४०० ०५८.**

**३.अेपीजी स्कूल, सेक्टर-१५, नेरुळ नवी मुंबई- ४०० ७०६.**

**४. डी व्ही ए पब्लिक स्कूल, प्लॉन नं-११, सेक्टर-१० रोड, ऐरोली, नवी मुंबई- ४६० ७०८.**

**५. लोक पुरम पब्लिक स्कूल , श्रीम.ग्लॅडस अल्हेरस रोड, पोखरण रोड-२ च्या समोर माजीवाडा ठाणे (प)- ४०० ६०६.**

सी.बी.एस.ई (CBSE) च्या विद्यार्थ्यांची त्यांच्या रुपांतरीत गुणांनुसार गुणवत्ता यादी लावली जाईल. आय.सी.एस.ई **(ICSE)** बोर्डाच्या विद्यार्थ्यांनी त्यांचे एकूण प्राप्त गुण (तीनही ग्रुपचे एकत्रित) अथवा बेस्ट फाईव्ह (Best Five) पर्याय घ्यावयाचा असल्यास ग्रुप एक व दोन मधील कोणतेही ०५(पाच) विषयांचे गुणांची बेरीज नमुद करावी. बेस्ट फाईव्ह (Best Five) साठी ग्रुप तीन मधील विषय ग्राहय धरता येणार नाही. याव्यतिक्ति इतर मंडळाच्या विद्यार्थ्यांनी त्यांचे इ. १० वी परीक्षेतील एकूण प्राप्त गुणप नमुद करावेत. गुणवत्ता यादीसाठी त्यांच्या गुणांचे रुपांतर ५०० पैकी प्राप्त गुण याप्रमाणे केले जाईल.

प्रवेश अर्ज भाग-१ मध्ये नमुद केलेली माहिती झोननिहाय मार्गदर्शन केंद्राकडून माहिती पुस्तिकेतील (पान क्र-३५-३६, ६५-६६) ॲप्रुव्ह करुन घेणे आवश्यक आहे, यासाठी विद्यार्थ्यांने गुणपत्रिका, शाळा सोडल्याचा दाखला, आरक्षण लागू असल्यास जातीचा दाखला व विशेष आरक्षण लागू असल्यास त्यासंबधीचे प्रमाणपत्र ही कागदपत्रे सादर करुन ॲप्रव्हल घेणे आवश्यक आहे. ॲप्रव्हल घेतले नाही तर भाग-२ पसंतीक्रम (Preference) फॉर्म भरता येणार नाही.

सदर ॲप्रुव्हल देण्याचे काम अन्य बोर्डाच्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या मार्गदर्शन केंद्रांमार्फत दि. ०५ जून २०१७ पासून सुरु होईल.

सदरचे परिपत्रक या कार्यालयाच्या www.dydepune.com तसेच इ. ११ वी प्रवेशाच्या http://pune.11thadmission.net या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

MRaut

(मिनाक्षी राऊत)
सहा. शिक्षण संचालक
पुणे विभाग पुणे-१

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :-**

१) मा. आयुक्त(शिक्षण) म.रा. पुणे

२) मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) म.रा.पुणे